# नियोजित वेळेपूर्वी मेट्रो ३ धावणार!

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो ३ मार्गिकेच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण डिसेंबर २०२३ पूर्वी करण्यात येणार आहे. संपूर्ण मेट्रो ३ जून २०२४ ला सेवेत दाखल होण्याचे उद्दिष्ट असले तरीही नियोजित वेळेपूर्वीच सर्वसामान्यांच्या सेवेत मेट्रो ३ दाखल होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ च्या विधानभवन व चर्चगेट मेट्रो स्थानकाच्या पाहणी दौऱ्यादरम्यान आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

**सविस्तर वृत्त** पान ७ वर

# नियोजित वेळेपूर्वी मेट्रो ३ सर्वसामान्यांच्या सेवेत दाखल होणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला विश्वास

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो ३ मार्गिकेच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण डिसेंबर २०२३ पूर्वी करण्यात येणार आहे. संपूर्ण मेट्रो ३ जून २०२४ ला सेवेत दाखल होण्याचे उद्दिष्ट असले तरीही नियोजित वेळेपूर्वीच सर्वसामान्यांच्या सेवेत मेट्रो ३ दाखल होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ च्या विधानभवन व चर्चगेट मेट्रो स्थानकाच्या पाहणी दौऱ्यादरम्यान आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे प्रकल्प संचालक सुबोध गुप्ता यावेळेस उपस्थित होते.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ हा भुयारी मेट्रो मार्ग सर्वसामान्यांसाठी वातानुकूलित प्रवासाचा आनंद देणार असून सुरक्षेच्या दृष्टीने विशेष काळजी घेण्यात आल्याचे यावेळेस मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मेट्रो ३ मार्गिकेत अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून अग्निशमन यंत्रणा सक्षमतेने कार्यान्वित करण्यात आली आहे. मेट्रो ३ प्रकल्प मोनोरेलसह मेट्रो १, मेट्रो २, मेट्रो ६ आणि मेट्रो ९ ला जोडणारा प्रकल्प आहे. या मेट्रो मार्गामुळे उपनगरीय रेल्वेवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. रस्त्यावरील ६ लाख वाहने कमी करण्यात मेट्रो ३ ला यश मिळणार आहे. पहिला टप्पा १२.५ किमी, तर दुसरा टप्पा २१.५ किमी लांब असून ८० ते ९० टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. संपूर्ण मुंबई महानगर परिक्षेत्रात ३३७ किमी मेट्रो जाळे पसरेल, तेव्हा रस्त्यावरील जवळपास ५० ते ६० लाख वाहने कमी होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळेस सांगितले. मेट्रो ३च्या आरे कारशेडसह वडाळा-ठाणे-कासारवडवली मेट्रो ४ साठी मोघरपाडा, स्वामी समर्थ नगर जोगेश्वरी ते विक्रोळी मेट्रो ६ साठी कांजूरमार्गची कारशेड व अन्य महानगर परिक्षेत्रातील कारशेडच्या भूखंडाचा प्रश्न सोडवण्यात आला असल्याचेही शिंदे यांनी स्पष्ट केले. मुंबईसारख्या शहरात भुयारी मेट्रोचे आव्हान यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाचे कौतुक यावेळेस मुख्यमंत्र्यांनी केले.

### जुन्यांवर टीका जाऊ द्या

प्रकल्पाला विलंब होऊन राज्य शासनाचा अधिक खर्च होऊ नये, यासाठी राज्य शासनाने योग्य वेळेत प्रकल्प मार्गी लावण्याचे काम केले आहे. आरे कारशेडचे काम रखडले होते. ते आम्हीच मार्गी लावले. शासनाचे पैसे वाचवले. पूर्वीच्या सरकारने काय केले, अशी जुन्यांवर टीका करण्यापेक्षा चांगले प्रकल्प पुढे न्यावेत, अशीही टिप्पणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केली.